आदेश

क्र./क.लि./पा.टं./कावी/५०१-०५/२०१८
जिल्हाधिकारी, कार्यालय,यवतमाळ
दिनांक : ०७/०२/२०१८

विषय :- सन २०१७-२०१८ या वर्षातील यवतमाळ शहरा करिता पाणी टंचाई क्षेत्र घोषित करणेबाबत..

संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (भाग५) असाधारण क्र.४९ दिनांक,१५ डिसेंबर,२००९

२.म.शा.(पाणी पु. व स्वच्छता विभाग)मंत्रालय मुंबई०३२ यांचे परिपत्रक,क्र./भुजल १०९९/प्र.क्र./९४७/पापु.१५/ दि.१४.०३.२०००

३. वरीष्ठ भुवैज्ञानीक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,यवतमाळ यांचे पत्र क्र/वभूवै /भूसविय/यवत/तांत्रिक/१३४ /२०१८ दिनांक ,०७/०२/२०१८

----०००----

ज्या अर्थी वरीष्ठ भुवैज्ञानिक,भुजल सर्वेक्षण आणी विकास यंत्रणा,यवतमाळ यांनी वरील संदर्भिय क्रमांक-०३ नुसार माझे असे निदर्शनास आणले आहे की, यवतमाळ जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान ९११.३४ मि.मि. असून, सन २०१७ चे पावसाळयात प्रत्यक्षात ५६२.९३ मि.मि. पर्जन्यमान झालेले असून, सरासरी टक्केवारी ६१.७७ टक्के झालेली आहे.

यवतमाळ शहर हे पी.जी.डब्लू-१ व २ या पाणलोट क्षेत्रात समाविष्ठ आहे. माहे जानेवारी -२०१८ मध्ये करण्यात आलेल्या पाणलोट क्षेत्रातील विहीरींचे निरीक्षण अहवालानुसार सरासरी भूजल पातळीत -१.६० मीटर नी घट झाल्यामुळे व यवतमाळ शहरास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणा-या चापडोह व निळोणा धरणात मृत पाणीसाठा उपलब्ध असल्याकारणाने व सदर पाणी लोकसंख्येच्या प्रमाणात कमी असल्यामुळे माहे फेब्रुवारी-२०१८ ते जून-२०१८ या कालावधीत पाणी टंचाई भासण्याची शक्यता आहे.

त्या अर्थी यवतमाळ जिल्हयातील यवतमाळ शहरा करिता मी, डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी यवतमाळ दिनांक, ३० जुन २०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी महाराष्ट्र भुजल (विकास व्यवस्थापन) अधिनियम,२००९ चे कलम २५ नुसार तसेच शासन परिपत्रक,क्र./भुजल १०९९/प्र.क्र./९४७/पापु.१५/दि.१४/०३/२००० मधील महाराष्ट्र भुजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनिमय) अधिनियम १९९३ चे कलम ४ अन्वये पाणी टंचाईग्रस्त क्षेत्र म्हणुन घोषित करित आहे.

सदर शहराच्या / गावांच्या सार्वजनिक पेयजलाचे स्त्रोतापासून १ कि.मी.अंतरापर्यंत अस्तित्वात असलेल्या किंवा प्रभाव क्षेत्रामधील, टंचाईच्या काळात,यापैकी जे अधिक असेल अशा क्षेत्रातील विहीरी /विंधन विहीरी /कुपनलिकांचा वापर पेयजलाव्यतीरिक्त ईतर उपायोगासाठी निर्बंध करण्यात येत आहे.

(डॉ.राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी यवतमाळ